वर्ष-०९ | अंक-३४ | मुंबई, मंगळवार ११ ते १७ जुलै - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
मौखिक आरोग्य:हिरड्यांवरील सूज दातांसह हृदयासाठीही नुकसानदायक; मधुमेहाचाही धोका, ब्रशनंतर रक्त आल्यास तपासून घ्या

3 → लोकसंख्या शिक्षण काळाची गरज
अमली पदार्थ विभागाचे पोलीस असल्याचं भासवून तरुणाकडून उकळले साडेपाच लाख; मुंबईतील धक्कादायक प्रकार ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## परदेशामधून क्रेडिट कार्डवरून ट्रान्झेकशन फसवणूक झालेली रक्कम ८४,५६३/- पोलिसांनी केली परत.



मिरारोड (दि.७) : Unauthorised Credit Card Transaction (Paysafe Financial Servises, London) मधील फसवणूक झालेली ८४,५६३/- रुपये परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश आले अधिक माहितीनुसार नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या श्रीमती हिना यांचे क्रेडीट कार्डवरुन ८४,५६३/- रुपये रक्कम काढून घेण्यात आल्याबाबत दिनांक १९/०५/२०२३ रोजी तक्रार सायबर गुन्हे कक्षास प्राप्त झालेली होती.त्यावरून नमूद तक्रारीबाबत दखल घेवून तक्रारदार यांच्या व्यवहाराबाबत सायबर कक्षाने माहिती प्राप्त केली. त्यानंतर तक्रारदार यांची फसवणूक रक्कम Unauthorised Credit Card Transaction - Overseas Transaction झाल्याचे दिसून आले. सदरची रक्कम Paysafe Financial Servises, London - Skrill3130 LONDON GB वर पुर्ण झाल्याची तपासात निष्पन्न झाल्याने तात्काळ पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक ८४,५६३/- रुपयांची ...पान २ वर...

## ऑनलाईन सर्च करताना सावधान!

# डॉक्टरांची खोटी अपॉईंटमेंट देऊन वकिलाला 99 हजाराचा गंडा

सध्याच्या काळात मोबाईल वापरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र याच माध्यमातून लोकांना फसवण्याचे प्रमाणही वाढले आहे. अशीच एक घटना समोर आली

**दिल्लीत एका सरकारी वकिलाला डॉक्टरांची खोटी अपॉईंटमेंट देऊन तब्बल 99 हजाराचा गंडा लावला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून हॉस्पिटलचा नंबर मिळाला होता, मात्र एका चुकीमुळे वकिलाचे हजारोचे नुकसान झाले आहे.**



आहे. दिल्लीत एका सरकारी वकिलाला डा ॅक्टरांची खोटी अपॉईंटमेंट देऊन तब्बल 99 हजाराचा गंडा घातल्याचं समोर आलंय. संबंधित वकिलाला इंटरनेटच्या (Internet) माध्यमातून हॉस्पिटलचा नंबर मिळाला होता, मात्र एका चुकीमुळे त्याचे हजारोचे नुकसान झाले आहे. हे डिजिटल युग फार पुढे गेले आहे. याचा जेवढा फायदा लोकांना होतो तेवढेच नुकसान देखील होते. आजकाल स्कॅमर्स (Scammer) प्रत्येक वेबसाईट्सवर लोकांना फसवण्यासाठी जाळे टाकतात. डिजिटल होत असणाऱ्या या जगात तुम्हाला सर्व प्रश्नांची उत्तरे आता एका सर्चवर मिळतात. असेच एका वकिलाने डा ॅक्टरच्या अपा ॅईंटमेंटसाठी नेहमीप्रमाणे इंटरनेटवर सर्च केले. आलेल्या सर्चवरून त्याने त्या नंबरवर का ॅल केला त्याच्या फोनवर एक ओटीपी आला. ओटीपी आल्याच्या काही मिनिटातच त्या वकिलाच्या बँक खात्यातून तब्बल 99 हजार रूपये उडाले. त्यांना मिळालेला नंबर हा रूग्णालयाचा नसून घोटाळेबाजांचा असल्याचे त्यांना लक्षात आले. घोटाळेबाजाने त्यांना आपल्या जाळ्यात अडकवले. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे .तपासात असे ...पान २ वर...

## गोरेगावमध्ये धावत्या रिक्षात महिलेवर अत्याचार, उत्तर प्रदेशामधून नराधमाला अटक





मुंबई : नुकतेच लोकलमध्ये तरूणीवर अत्याचार झाल्याची माहिती समोर आली होती. आता महिला अत्याचाराच्या घटनेने मुंबई पुन्हा एकदा हादरली आहे. नुकतेच एक नवीन अत्याचाराची घटना समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली आहे. आरोपीचे नाव इंद्रजीत सिंह असे आहे. आरोपीने प्रथम महिलेला मारहाण केली. त्यानंतर तिला धमकावत तिच्यावर बलात्कार केला. तसेच, घडलेला प्रकार कोणालाही सांगू नकोस, अशी धमकीही त्याने तरुणीला दिली.अत्याचार करून धमकावले : इंद्रजित सिंह हा आरोपी उत्तर प्रदेशचा रहिवासी ...पान २ वर...

## टोमॅटोवरून ग्राहक आणि विक्रेते आपापसात भिडले; पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



पुणे : गेल्या काही दिवसांपासून देशासह राज्यात टोमॅटोचे भाव गगनाला भिडले असून 80 ते 100 रु. किलो भावाने सध्या टोमॅटो विकले जात आहेत. गृहिणी आता टोमॅटोचा वापर जपून करताना पाहायला मिळत आहे. सध्या घराघरात टोमॅटोचीच चर्चा पाहायला मिळत आहे.

टोमॅटोच्या दरावरून झुंपली: याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रार गोपाल ढेपे हे भाजी आणण्यासाठी वडगाव शेरी येथील भाजी मार्केटमध्ये गेले होते. त्यांनी भाजी विक्रेते अनिल गायकवाड यांनी टोमॅटोचा भाव विचारला. त्यांनी टोमॅटो २० रुपये पावशेर असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना खूप महाग आहेत असे उत्तर दिले. त्यावरुन अनिल गायकवाड यांनी तक्रारदारांनी शिविगाळ केली. तक्रारदाचे तोंडावर बुक्कीने मारहाण करून वजनकाट्यातील वजन हातात घेऊन त्यांच्या उजव्या गालावर मारून जखमी केले, असे ...पान २ वर...

## व्यापाऱ्यावर ऍसिड हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांस पोलिसांनी केली अटक

विरार (दि. ०७) : विरारमध्ये व्यापाऱ्यावर ऍसिड हल्ला करणा-या आरोपीस अटक गुन्हे शाखा कक्ष-3, विरार यांची कामगिरी.अधिक माहितीनुसार दिनांक ०८/०७/२०२३ रोजी विरार पुर्वेकडील एल.ई.डी. लाईटचे व्यापारी श्री. मोबीन असमत शेख, वय ४२ वर्षे, रा- गोपचरपाडा विरार पुर्व हे रात्रौ ०८.३० वा. च्या सुमारास त्यांच्या ऍक्टिव्हा गाडीवरुन मकवाना कॉम्पलेक्स परिसरात बाजारात जात असताना अनोळखी दोन इसमांनी त्यांच्या जवळील ऍसिड



या अत्यंत दाहक व ज्वलनशील पदार्थाने भरलेली प्लास्टीक पिशवी मोबीन शेख यांच्या पाठीमागील बाजुस फेकल्याने शेख यांच्या मानेला दुखापत झाल्याबाबत फिर्या द दिल्याने दोन अनोळखी इसमां विरुध्द विरार पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष- ३, विरारचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक विश्लेषण व ...पान २ वर...

## मुलाच्या सहाय्याने पतीचा खून; संशयित ताब्यात




नाशिक : पतीचे नात्यातील एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन पत्नीने मुलाच्या सहाय्याने डोक्यात मुसळीने वार करून खून केला. पाथर्डी फाटा परिसरातील दामोदर चौकाजवळील यशवंत नगरात सोमवारी पहाटे हा प्रकार घडला. दादाजी गवळी (४१, रा. समृध्दी प्लाझा) यांचे नात्यातील एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन पत्नी आणि त्यांच्यात नेहमी भांडण होत असे. पत्नी सुनीता गवळी (४०) आणि त्यांचा मुलगा निशांत गवळी ...पान २ वर...

## तोतया आयपीएस अधिका-यानसह भाजप पदाधिका-या कडून काँग्रेस पदाधिका-याला २ लाखांचा चुना

ठाणे : जिल्हातील ग्रामीण भागात भाजपच्या पदाधिकाऱ्याने तोतया आयपीएस अधिकाऱ्याशी संगणमत करून नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका कॉंग्रेस पदाधिकाऱ्याला २ लाखाचा चुना लावल्याची घटना समोर आली आहे. ही घटना मुरबाड तालुक्यातील टोकावडे गावाच्या हद्दीत घडली आहे. याप्रकरणी टोकावडे ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघांवर भादंवि कलम ४२० सह विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून





पोलिसांनी तपास सुरू केला आहे.आरोपीची नावे : संतोष बबन पवार (रा. माल्हेड, ता. मुरबाड ) आणि जगदीश बबन वाळींब (रा. शिरगाव, ता. शहापूर ) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीची नावे आहेत. तर मधुकर देसले (वय ५६, रा. टोकावडे ) असे तक्रारदार कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे. विशेष म्हणजे आरोपी संतोष पवार हा ठाणे जिल्हा भाजपच्या कामगार आघाडीचा पदाधिकारी आहे. तर आरोपी जगदीश वाळींब हा तोतया आयपीएस अधिकारी असल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले. दोन लाखांची मागणी : तक्रारदार मधुकर देसले हे कुटूंबासह मुरबाड तालुक्यातील ...पान २ वर...

## आधी पत्नीची हत्या मग पतीचे अपहरण, यवतमाळच्या पुसदमधील धक्कादायक घटना समोर

यवतमाळच्या पुसद तालुक्यातील वसंतवाडी येथे एक धक्कादायक प्रकर उघडकीस आला आहे. ऊस तोडीच्या पैशांच्या देवाण - घेवाणीवरुन एका महिलेच्या पतीचे अपहरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. यावेळी त्या महिलेने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता चार ते पाच जणांनी तिच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आला. त्यानंतर त्या महिलेच्या पतीला घेऊन ते लोक पसार झाले. याप्रकणी त्या चार ते पाच




जणांच्या विरोधात खंडाळा पोलीस ठाण्यातमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेमकं काय घडलं? अनिता अनिता निरंजन राठोड वय वर्ष 37 असं हत्या झालेल्या महिलेचं नाव आहे. मृतक निरंजन राठोड हा मुकादम असून तो ऊसतोड मजूर उपलब्ध करुन देण्याचे काम ...पान २ वर...

## रिक्षाचालकाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग



मुंबई : देवनार येथे रिक्षातून जाणाऱ्या एका १४ वर्षांच्या मुलीचा रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदाराने विनयभंग केल्याची घटना घडली. याप्रकरणी देवनार पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. मानखुर्द परिसरात राहणारी पीडित मुलगी आठ दिवसांपूर्वी देवनार परिसरात वास्तव्यास असलेल्या आजी-आजोबांना जेवण देण्यासाठी गेली होती. जेवण दिल्यानंतर ती रिक्षाने घरी परत येत होती. ...पान २ वर...

# राज्यातील कारागृहात कैद्यांना व्हीआयपी ट्रीटमेंट? मोबाईल फोन आढळल्याने खळबळ, तपास सुरु

महाराष्ट्रातील विविध तुरुंगात कैद्यांकडून मोठ्या प्रमाणात मोबाईल फोन सापडल्याने आता महाराष्ट्रात कारागृह प्रशासन आता सतर्क झाले आहे. प्रशासनाने आता या प्रकरणी शोध मोहीम सुरू केली असून दोषीं अधिकाऱ्यांवर कारवाई करून निलंबित करण्याची कारवाई सुरू केली आहे. कठोर सुरक्षा व्यवस्था असलेल्या कारागृहातील कैद्यांकडे मोबाईल फोन (Mobile Phones) आढळून आल्याने या कैद्यांना कारागृहात व्हीआयपी ट्रीटमेंट कोण देत आहे, याबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. कल्याण आधारवाडी जेल आणि कोल्हापूर सेंट्रल जेल या तुरुंगात नुकतेच मोबाईल सापडल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणी तेथील वरिष्ठ अधिकारावर कारवाई करून त्यांना निलंबित केले आहे कल्याण आधारवाडी जेलचे अधीक्षक अंकुश सदाफुले आणि कोल्हापूर सेंट्रल जेलचे तुरुंग अधिकारी सतीश कदम आणि म्हस्के यांना निलंबित करण्यात




आलेले आहे. या दोन्हीही तुरुंगात मोबाईल फोन सापडल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्यात आलेली आहे. मात्र, मोबाईल फोन कुठून येतात, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. काही दिवसापूर्वी कल्याण आदरवाडी जेलमध्ये 16 मोबाईल फोन सापडले होते. पण या प्रकरणात वरिष्ठांना माहिती दिली गेली नाही अथवा गुन्हादेखील दाखल केला नव्हता. त्यामुळेच या ...पान २ वर...

## हॉटेल चालक म्हणावं की गुंड...; पोलिसांच्या कारवाईत चक्क गावठी क ा व कोयता लागला हाती



छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी केलेल्या एका कारवाईत हॉटेल चालकाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. चिकलठाणा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र खांडेकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. एकोड पाचोड रोड वरती खडी क्रेशरच्या पुढे असलेल्या हॉटेल जंगदवाचा मालक सुनिल वैजिनाथ्ज़ चंदने (वय 27 वर्षे रा. आपतगाव ता.जि. छत्रपती संभाजीनगर) हा स्वतः कडे एक गावठी कट्टा बेकायदेशिर व अवैधरित्या बाळगत असल्याची ...पान २ वर...

# मौखिक आरोग्य:हिरड्यांवरील सूज दातांसह हृदयासाठीही नुकसानदायक; मधुमेहाचाही धोका, ब्रशनंतर रक्त आल्यास तपासून घ्या



मौखिक आरोग्याकडे सर्वा धिक दुर्ल क्ष केले जाते. अमेरिकेत ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ५०% लोकांना हिरड्यांशी संबंधित आजार आहेत. तज्ज्ञ म्हणतात, 'तोंडातील या मूक आजारामुळे दातांना खूप नुकसान होते.' जर तुमची लाळ आठवड्यातून एकदा किंवा दोनदा ब्रश किंवा फ्लॉस केल्यानंतर गुलाबी होत असेल तर हिरड्यांना सूज असण्याची शक्यता आहे. (हे सुरुवातीचे लक्षण) काही वेळा लक्षणेही दिसत नाहीत. योग्य वेळी उपचार न केल्यास समस्या वाढू शकतात. या समस्या काय आहेत, सुरुवातीची लक्षणे व त्यापासून बचाव कसा करावा, जाणून घ्या दंततज्ज्ञांकडून...

**समस्या: बॅक्टेरिया व प्लेकमुळे हिरड्या सुजू लागतात**

पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातील पीरियओडॉन्टल रोगांचे तज्ज्ञ डॉ. रॉड्रिगो निवा म्हणतात, "गिंगिव्हायटिस' ही एक सामान्य समस्या आहे. टेक्सास विद्यापीठातील पीरिओडॉन्टिक्स विभागाच्या प्रमुख डॉ. डेबोराह फॉयल म्हणाल्या, "हे दातांवर बॅक्टेरिया आणि प्लेकमुळे होते. हे जीवाणू हिरड्यांच्या ऊतींवर हल्ला करून नष्ट करू शकतात. यामुळे दातांना आधार देणारे हाड तुटते आणि दातांची मुळे उघडी पडतात. दातांमध्ये जागा तयार होते, त्यामुळे ते मोकळे होऊ लागतात, उपचार न केल्यास स्मृतिभ्रंश, मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका असतो.

**लक्षणे : हिरड्यांमधून रक्त येणे, रंग बदलणे, तोंडातून दुर्गंधी येणे**

टफ्ट्स विद्यापीठातील दंततज्ज्ञ डॉ. नताली जेओंग स्पष्ट करतात, ब्रश करताना किंवा फ्लॉस करताना हिरड्यांतून रक्त येते. हिरड्या गुलाबीऐवजी लाल दिसतात. दातांत पोकळी नसली तरी ही समस्या उद्भवू शकते. तोंडातून दुर्गंधी येते, चव खराब होते. चघळताना त्रास होत असेल आणि दातांमध्ये मोकळेपणा येत असेल तर सावध राहणे आवश्यक आहे.

**उपचार : खोलवर रूट साफ करणे आणि करेक्टिव्ह शस्त्रक्रिया**

नियमित ब्रश आणि फ्लॉसिंगमुळे हिरड्यांचे आजार टाळता येतात, असे डॉ. रॉड्रिग्ज म्हणतात. जर आजार आधीच असेल तर साफसफाईने काम होणार नाही. दंतचिकित्सक खोलवर रूट सफाई, अँटिबायोटिक आणि करेक्टिव्ह सर्जरीद्वारे उपचार करतात. विशेषज्ञ एका विशेष उपकरणाने हिरड्यांवरआलेली सूज बरी करू शकतात. हे हिरड्या व दात यांच्यातील अंतर मोजते. मोठी जागा गांभीर्य दर्शवते. प्लॅकची समस्या कायम राहिल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने माऊथवॉशचा वापर करता येतो. खूप थंड किंवा खूप गरम अन्न खाणे टाळा.

# इशारा:कोका-कोलाचा गोडवा म्हणजे कर्करोगाला आमंत्रण, हल्ड म्हटले एस्पार्टेम स्वीटनर शरिरासाठी धोकादायक

कोका-कोला प्यायल्याने कर्करोगाचा धोका असतो. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) ने असे म्हटले आहे. इशारा देताना WHO ने म्हटले की, कोका-कोलासह शीतपेय आणि खाद्यपदार्थांमध्ये गोड करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम स्वीटनर एस्पार्टेममुळे कर्करोगाचा धोका आहे. जुलैमध्ये इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर (IARC) कर्करोगाला कारणीभूत ठरू शकणाऱ्या किंवा वाढवणाऱ्या पदार्थांच्या यादीत एस्पार्टेमचा समावेश करेल. कोका-कोला, डाएट सोडापासून च्युइंगम आणि इतर काही पेयांमध्ये एस्पार्टेमचा वापर केला जातो.

**एस्पार्टेम असलेली उत्पादने किती सुरक्षित?**

एस्पार्टेम असलेली उत्पादने किती प्रमाणात घेणे, सुरक्षित आहे हे WHO ने अद्याप सांगितलेले नाही. हानिकारक पदार्थ किती प्रमाणात सेवन करू शकतात याबाबतची माहिती डब्ल्यूएचओची स्वतंत्र तज्ज्ञ समिती देत असते. सहसा ही सूचना जॉइंट W H O अँड फूड अँड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन एक्सपर्ट कमेटी ऑन फूड ॲडिटिव्ह (JECFA) द्वारे दिली जाते.

**JECFA घेत आहे आढावा**

डब्ल्यूएचओची ॲडिटिव्ह्ज जेईसीएफए समिती यावर्षी एस्पार्टेमच्या वापराबाबत आढावा घेत आहे. 1981 मध्ये, जेईसीएफएने सांगितले की, एस्पार्टेमचे दररोज एका मर्या देपर्यंत सेवन केले तर ते सुरक्षित आहे. उदाहरणार्थ, जर 60 किलो वजनाची व्यक्ती दिवसातून 12-36 कॅन डाएट सोडा पित असेल तर ते धोका पत्करत आहेत.




गेल्या वर्षी फ्रान्समध्ये एस्पार्टेमवर संशोधन झाले होते. यादरम्यान आर्टिफिशियल स्वीटनरचे सेवन करणाऱ्या एक लाख लोकांवर अभ्यास करण्यात आला. त्यात असे आढळून आले की, जे लोक मोठ्या प्रमाणात कृत्रिम गोड पदार्थांचे सेवन करतात (ज्यात एस्पार्टेमचा समावेश आहे) त्यांना कर्करोगाचा धोका जास्त असतो.

**कोल्ड्रिंकमध्ये 10 चमचे साखर**

एका संशोधन अहवालानुसार, शीतपेयाच्या 350 मिलीच्या लहान कॅनमध्येही 10 ते 12 चमचे साखर विरघळली जाते.

## रिक्षाचालकाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

त्यावेळी आरोपी रिक्षाचालकाने मुलीला चेंबूर - वाशीनाका परिसरात नेले. या ठिकाणी रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदाराने मुलीला निर्जन ठिकाणी नेऊन तिचा विनयभंग केला. मात्र संधी साधून मुलीने आरोपींच्या तावडीतून सुटका करून घर गाठले. या घटनेनंतर घाबरलेली पीडित मुलगी घरात गप्प असायची. त्यामुळे कुटुंबियांनी तिला विश्वासात घेऊन चौकशी केली असता तिने घडलेला प्रकार त्यांना सांगितला. तिच्या कुटुंबियांनी शनिवारी याप्रकरणी देवनार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## आधी पत्नीची हत्या मग पतीचे अपहरण,

करत होता. दरम्यान मराठवाड्यातील एका कारखानदाराने ऊस तोडीसाठी निरंजन राठोडला ऊस तोड मजूर पुरविण्याकरिता सांगितले होते. यासाठी त्या कारखानदाराने निरंजनला दोन वर्षांपूर्वी पाचे ते सहा लाख रुपये दिले असल्याची माहिती मिळत असल्याचं सांगितल आहे. परंतु निरंजन काही कारणास्तव मजूरांना पाठवू शकला नाही. त्यानंतर निरंजन याने घेतलेल्या रकमेपैकी अर्धी रक्कम कारखानदाराला परत देखील केली होती. त्यानंतर उर्व रितरक्कम परत देण्यासाठी निरंजन टाळाटाळ करत होता अशी माहिती खंडाळा पोलिसांनी दिली आहे. त्या कारखानदारांच्या चार ते पाच माणसांनी निरंजनचे घर गाठले. निरंजन आणि त्याची यवतमाळमधील पुसद तालुक्यातील वसंतवाडी या गावामध्ये राहत होते. हे चार ते पाच जण रात्री वसंतवाडी येथे पोहचले. पोहचल्यावर त्यांनी निरंजनला मारहणार करण्यास सुरुवात केली. हे लोक निरंजनला गाडीत घालून पसार होत असतानाच निरंजनची पत्नी त्यांच्या गाडीसमोर येऊन उभी राहिली. गाडी अडल्याने तिला गाडीने धक्का देण्यात आला. त्यानंतर तिच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले. त्यामुळे अनिता गंभीर जखमी झाली आणि काही क्षणातच तिचा मृत्यू झाला. ते चार ते पाच जण निरंजनला घेऊन वाशिम मार्गे मेहकरकडे पसार झाले.तसेच या पसार झालेल्या लोकांना पकडण्यासाठी खंडाळा पोलिसांचे एक पथक तात्काळ रवाना झाल्याची माहिती पोलीस निरीक्षक निलेश चावडीकर यांनी दिली आहे. या पसार झालेल्या लोकांचा शोध सध्या पोलीस घेत आहेत. पण यामुळे यवतमाळमधील पुसदमध्ये एकच खळबळ माजली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्मा णझाले आहे. त्यामुळे पोलीस यासंदर्भा तपुढील कारवाई काय करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## गोरेगावमध्ये धावत्या रिक्षात महिलेवर

आहे. तो मुंबईत रिक्षा चालवत असे अशी माहिती आरे पोलिसांनी दिली आहे. आरोपीने महिलेवर अत्याचार करून धमकावल्यानंतर भितीपोटी तिने घडलेला प्रकार कोणालाही सांगितला नाही. काही महिन्यांपूर्वी पीडित महिलेची प्रसूती झाली होती. मात्र घटनेच्या काही दिवसांनी महिलेला रक्तस्त्राव होऊ लागल्याने या घटनेला वाचा फुटली. रक्तस्त्राव झाल्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेतली.महिलेच्या शरीरावर काही जखमा : रुग्णालयात डॉक्टरांनी सर्व तपासण्या केल्यानंतर डॉक्टरांना महिलेच्या शरीरावर काही जखमा दिसून आल्यानंतर संशय बळावला. त्यावेळी डॉक्टरांनी विश्वासात घेऊन महिलेला सर्व काही विचारले. त्यानंतर महिलेने तिच्यासोबत घडलेली दुर्दैवी घटना डॉक्टरांना आणि कुटुंबीयांना सांगितली. त्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. महिलेला मारहाण : आरे पोलिसांनी गुन्हा दाखल करुन तात्काळ तपास सुरू केला. आरे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला सीबीडी बेलापूर येथे तिच्या मावशीच्या घरी गेली होती. तिथून तिने घरी परतण्यासाठी नवी मुंबई ते गोरेगाव रिक्षा बुक केली. रिक्षा आरे कॉलनीत पोहचली, त्यावेळी रिक्षा चालकाने रिक्षा एका निर्जनस्थळी नेली. तिथे त्याने आधी महिलेला मारहाण केली. त्यानंतर महिलेवर जबरदस्ती करत बलात्कार केला. नराधम चालकाने महिलेला धमकावले आणि घटनास्थळावरुन पळ काढला. त्यानंतर आरोपी इंद्रजित थेट उत्तर प्रदेशात पळाला.

आरोपीला ठोकल्या बेड्या : आरे पोलिसांनी पीडितेकडून जबाब नोंदवून तात्काळ आरोपीचा शोध सुरू केला. सर्व प्रथम आरे पोलिसांनी रिक्षाच्या मालकाला गाठले. त्यानंतर घटनेत्या दुसऱ्या दिवशीच चालक फरार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरे पोलिसांनी रिक्षा मालकाकडून आरोपीची सर्व माहिती घेऊन उत्तर प्रदेश गाठले. आरोपीला उत्तर प्रदेशात बेड्या ठोकल्या. रविवारी आरोपीला अटक करुन उत्तर प्रदेशातून मुंबईत आणण्यात आले आहे. आज त्याला कोर्टा तहजर केले जाणार असल्याची माहिती पोलीस सूत्राने दिली आहे. आरे पोलिसांनी तात्काळ या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीविरोधात भारतीय दंड संविधान कलम 376 आणि 506 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# आईच्या उपस्थितीचा मुलांवर आयुष्यभर परिणाम:मदत करणा-या मातांची मुले असतात अधिक हुशार

मुलांच्या आयुष्यात आईची भूमिका महत्त्वाची असते हे सत्य नाकारता येत नाही. लंगोट बदलण्यापासून ते खेळांमध्ये चीअर करण्यापर्यंत, माता मल्टीटास्किंगमध्ये अधिक चांगल्या असतात. पण तुम्हाला माहीत आहे का की त्यांचा पाठिंबा मुलांसाठी उपस्थितीपेक्षा जास्त आहे? जेव्हा आई लहान-लहान गोष्टींमध्ये मुलांना जास्त मदत करते तेव्हा मुलांचा सामान्य बुद्धिमत्ता स्कोअरही जास्त होतो. आईच्या बुद्धिमत्तेचा स्कोअर कमी असला तरी मुलांवर त्याचा परिणाम होत नाही. हा परिणाम मुलांवर आयुष्यभर राहतो. इंटेलिजन्स



जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या ताज्या अभ्यासात हा दावा करण्यात आला आहे.14 महिने ते 10 वर्षे वयोगटातील मुलांवर केलेला अभ्यास

संशोधकांनी अभ्यासात 1,075 मुलांचा समावेश केला. यामध्ये विविध आणि जातीय पार्श्वभूमीच्या मुला-मुलींचा समावेश होता. या निकालांवरून असे दिसून आले की, एक आधार देणारी आई असण्याचा थेट परिणाम मुलांच्या बुद्धिमत्तेवर होतो. जेव्हा मातांनी आपल्या मुलांना अधिक पाठिंबा दर्शविला तेव्हा मुले सामान्य बुद्धिमत्तेसह देखील उच्च गुण मिळवतात. अभ्यास लेखक आणि संशोधक कर्टिस डंकेल म्हणतात, "आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात सामान्य बुद्धिमत्तेतील वैयक्तिक फरक मुख्यत्वे एकाच घरात राहणाऱ्या लोकांद्वारे सामायिक केलेल्या वातावरणामुळे असतो." प्रौढत्वात असताना, बहुसंख्य फरक अनुवांशिकतेमुळे असतात.

## परदेशामधून क्रेडिट कार्डवरून

फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच सदरची फसवणूक रक्कम पुन्हा तक्रारदार यांच्या मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली. अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...• Unknown Link, Email वर क्लिक करू नये.• आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयहक्तिक माहिती उघड करू नये.• कोणत्याही अनोळखी ल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पो. नि. श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.नि. प्रसाद शेनोळकर, स.फौ. संतोष चव्हाण, म.पो. हवा. माधुरी धिंडे, पो. अंम. गणेश इलग, प्रविण आव्हाड, पल्लवी निकम, अमिना पठाण, सुवर्णा माळी, कुणाल सावळे यांनी केली आहे.सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११०१३५सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक ९०० ४८८ ०९३५सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in

## व्यापाऱ्यावर ॲसिड हल्ला

गुप्त बातमीदाराकरवी प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी १) मस्तान उस्मान शेख, अलसिफा व्हाईट हाऊस, गोपचर पाडा, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर, २) संकेत परमेश्वर शर्मा, रा. बापु सी अपार्टमेंट, रामु कंम्पाऊन्ड विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर, जयेश राकेश तरे, रुम नंबर ०२, गगनगिरी अपार्टमेंट, रामु कंम्पाऊन्ड विरार पुर्व, ता .वसई, जि. पालघर यांना दिनांक १०/०७/२०२३ रोजी ताब्यात घेवुन तपास केला असता आरोपी क्रमांक ०१ याने त्याच्या वैवाहीक वादाच्या कारणावरुन आरोपी क्रमांक २ व ३ यांना ४,००,०००/- ( चार लाख ) रुपयांची सुपारी देवून त्यांच्या करवी फिर्या द्देणार यांचेवर ॲसिड हल्ला केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. यातील आरोपी क्रमांक ०१ मस्तान उस्मान शेख यांचा पोलिसांनी पुर्व इतिहास पडताळुन पाहता त्याच्या विरुध्द यापुर्वी देखील विरार पोलीस ठाणे येथे मारामारी व सरकारी कामात अडथळा आणल्या बाबत गुन्हे दाखल आहेत. सदर ॲसिड हल्ला प्रकरणी अनोळखी आरोपी याच्या बाबत कोणताही सुगावा नसताना गुन्हें शाखा कक्ष ३, विरारच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदार यांच्या मार्फतीने कसोशीने तपास करुन ४८ तासांच्या आत नमुद गुन्हयातील मुख्य सुत्रधार व त्याचे दाने साथीदार यांना ताब्यात घेण्यात यश मिळविले असुन आरोपी यांना पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-३, विरारचे पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो. अंम. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु. ब. प्रविण वानखेडे तसेच स .फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल केलीआहे.

## टोमॅटोवरून ग्राहक आणि विक्रेते

तक्रारदारांनी नमूद केले आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करत आहे. भाजीपाल्याच्या दरातही वाढ : सध्या गेल्या काही दिवसांपासून टोमॅटोचे दर हे वाढले आहेत. बाजारात 80 ते 100 रुपये किलो दराने टमाटे विक्री केली जात आहे. यंदा टोमॅटोचे कमी उत्पादन झाल्याने टोमॅटोला मागणी वाढली आहे. यासह भाजीपाल्यांचे दरही वाढलेले पाहायला मिळत आहे.टोमॅटोने ओलांडली शंभरी : देशातील अनेक भागात टोमॅटोच्या दराने शंभरी ओलांडली आहे. नवी मुंबई वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत (एपीएमसी) घाऊक बाजारात टोमॅटोचे भाव ६० ते ८० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर 100 ते 120 रुपये दराने विकले जात आहेत. ही दर वाढ दिल्ली-एनसीआर बाजारासह उत्तर प्रदेश महाराष्ट्र, बिहार, झारखंड आणि मध्य प्रदेश राज्यांमध्ये पाहायला मिळत आहे. गेल्या आठवड्यात जे टोमॅटो दर्जा नुसार ३० ते ४० रुपयांनी बाजारात विकले जात होते, ते आता ७० ते ९० रुपये दराने विकले जात आहेत. तर काही ठिकाणी १०० रुपये किलोच्या आसपास दर पोहोचले आहेत. बिपरजॉय वादळामुळे झालेल्या पावसाचा राज्यातील टोमॅटो पिकावर परिणाम झाला आहे. बिपरजॉय वादळामचा फटका गुजरातमधील टोमॅटो पिकाला चांगलाच बसला आहे. तर तिकडे बिहार आणि पश्चिम बंगालमधील कडाक्याच्या उष्णतेमुळे टोमॅटोच्या पिकावर परिणाम झाल्याने आवक घटली आहे. देशातील अनेक राज्यांतील मंडईंमध्ये टोमॅटोची आवक घटली, त्यामुळे दर गगनाला भिडले आहेत. दुसरीकडे पावसाला सुरुवात झाल्याने टोमॅटो पिकावर परिणाम झाल्याचे समजते. दरम्यान, इतर शेतमालाला अधिक भाव मिळाल्याने, शेतकऱ्यांनी टोमॅटो पिकाकडे दुर्ल क्षकेल्याचेही कारण पाहायला मिळते आहे.

## राज्यातील कारागृहात कैद्यांना

तुरुंगातील अधीक्षकावर कारवाई करत त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्याचबरोबर कोल्हापूर जेलमध्ये सुद्धा असाच प्रकार घडवून काही मोबाईल फोन सापडले होते. त्यासंदर्भा तहीगुन्हा दाखल झाला नाही अथवा वरिष्ठांना कोणतीही माहिती दिली गेली नाही. त्यामुळेच दोन जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आली आहे. एकच मोबाईल मध्ये 22 विविध सीम कार्ड वापरले गेले असल्याची माहिती समोर आली आहे. या सर्व प्रकरणानंतर कारागृह विभाग सतर्क झाला असून महाराष्ट्रातील सर्व कारागृहात विशेष शोध मोहीम सुरू करण्यात आलेली आहे कारागृह प्रशासनांला संशय आहे की ठाणे, तळोजा, येरवडा, नागपूर आणि इतर काही कारागृहात मोबाईल फोन वापरले जातात आणि त्या निमित्ताने ही शोध मोहीम चालू केलेली आहे. कुटुंबियांसोबत संपर्क साधण्यासाठी तुरुंगातील कैद्यांना आता कॉईन बॉक्स बंद, स्मार्ट कार्ड सुरु; कैद्यांसाठी नवीन उपक्रम

महाराष्ट्रातील तुरुंगातील कैद्यांना आता कॉईन बॉक्स नाहीतर त्यांच्या नातेवाईकांशी स्मार्ट कार्ड फोनद्वारे संवाद साधण्याची सुविधा मिळणार आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहाने या नाविन्यपूर्ण सेवेची चाचणी घेण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षक (तुरुंग आणि सुधारात्मक सेवा), अमिताभ गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली ही सुविधा सुरु करण्यात आली आहे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास, स्मार्ट कार्ड फोन उपक्रम संपूर्ण राज्यात राबविण्यात येईल. कैद्यांना त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधण्यासाठी कॉईन बॉक्स देण्यात आला होता. मात्र, बाजारात कॉईन बॉक्ससेची उपलब्धता नसल्याने आणि त्यांची दुरुस्तीची सोय नसल्याने ही यंत्रणा जीर्ण झाली होती. शिवाय, विविध सुविधा बंद केल्यामुळे कैदी आणि त्यांच्या कुटुंबीयांमधील संवादात अडथळा निर्मा णझाला.

## तोतया आयपीएस अधिका-यानसह

टोकावडे परिसरात राहतात. तर आरोपी संतोष पवारचे मुरबाड तहसील कार्यलयासमोर झेरॉक्सचे दुकान आहे. याच दुकानात दोघांची २०२१ साली ओळख झाली होती. त्यानंतर २५ ऑगस्ट २०२१ दोघांची पुन्हा दुकानात भेट झाली असता, आरोपी संतोषने देसले यांच्याकडे पत्नीचे गहाण ठेवलेले दागिने सोडविण्यासाठी पाच दिवसासाठी दोन लाखांची मागणी केली. ओळख असल्याने आरोपीवर विश्वास ठेवून देसले यांनी दोन लाख रुपये आरोपी संतोषला दिले. नोकरीचे आमिष : त्यानंतर सायंकाळीच पुन्हा दुकानात भेट झाली असता, आरोपी संतोषने देसले यांना आरोग्य विभागात नोकरीसाठी जाहिरात निघाल्या आहेत. जर तुमच्या कोणा नातेवाईकाला नोकरी लावायची असले तर सांगा. माझा नातेवाईक मोठा अधिकारी असून आयपीएस ऑफिसर आहेत. ते नोकरीवर लावण्याचे काम करून देतील. असे बोलून आरोपी संतोषने देसले यांना नोकरीचे आमिष दाखवले. आरोपीच्या अमिषाला बळी पडून देसले यांनी भाचा गणेश घोलप याने आरोग्य विभागात वाहन चालक म्हणून अर्ज भरला आहे. त्याचे नोकरीचे काम होणार का ? असे देसले यांनी विचारले असता, आरोपीने होकार दिला.पैशांची मागणी : त्यानंतर २६ ऑगस्ट २०२१ रोजी मुंबईतील ताज हॉटेलच्या लगत असलेल्या हॉटेलमध्ये आरोपी संतोषने तोतया आयपीएस अधिकारी जगदीश याची भेट देसले यांना करून दिली. त्यावेळी हॉटेलमध्ये मिटिंग होऊन भाचा गणेशच्या नोकरीचे काम होईल. मात्र तुम्हाला १० लाख द्यावे लागतील. मात्र त्याअगोदर ॲडव्हांस म्हणून ३ लाख द्या, असे तोतया आयपीएस अधिकाऱ्याने सांगितले. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून देसले यांनी आणखी एक लाख आणि आरोपी संतोषने दागिने सोडविण्यासाठी घेतलेले दोन लाख, असे एकूण तीन लाख दिल्याचे देसले यांनी तक्रारीत म्हटले आहे. रक्कम परत करण्याचा तगादा : त्यानंतर २ संप्टेंबर २०२१ नंतर देसले यांनी भाचा गणेश याच्या नोकरीचे काम कधी होणार? असे आरोपी संतोष याला विचारले असता, आरोग्य विभागाची भरती परीक्षा रद्द झाली. असे देसले यांना सांगितल्याने त्यांनी आरोपीकडे दिलेली रक्कम परत करण्याचा तगादा लावला होता. त्यामुळे आरोपीने धनादेश दिले होते. मात्र ते धनादेश बँकेत जमा केले असता दोन्ही धनादेश बाऊंस झाले. त्यानंतर वर्ष उलटूनही रक्कमेसाठी देसले आरोपीकडे तगादा लावत असताना आरोपी संतोषने ५० हजार दिले.पोलीस ठाण्यात धाव : दरम्यान, नोकरीसाठी दिलेल्या रक्कमेपैकी दोन लाख रुपये परत देण्यासाठी आरोपी संतोष हा टाळाटाळ करीत होता. शिवाय देसले यांना मारण्याची धमकी देत, माझा नातेवाईक आयपीएस अधिकारी असल्याने मला पोलीस घाबरतात असे बोलून आरोपी संतोष सतत धमकी देत होता. अखेर रक्कम परत मिळत नसल्याचे पाहून देसले यांनी ७ जुलै २०२३ रोजी टोकावडे पोलीस ठाण्यात धाव घेऊन दोन्ही आरोपी विरोधात भादंवि कलम ४२०, १७०, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

## हॉटेल चालक म्हणावं की गुंड...;

माहिती खांडेकर यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी या हॉटेल चालकाला बेड्या ठोकल्या. या प्रकरणी चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपनीय माहितीच्या आधारे चिकलठाणा पोलिसांनी एकोड पाचोड रोडवरती खडी क्रॅशरच्या पुढे असलेल्या हॉटेल जंगदबा येथे सापळा लावला होता. यावेळी हॉटेल मालक सुनिल वैजिनाथ चंदने हा हॉटेलमध्येच असताना पथकांने त्याच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन होते. त्यानंतर त्याच्यावर अचानक झडप घालुन त्याला ताब्यात घेतले. यावेळी त्याला अनाधिकृतपणे स्वतःजवळ बाळगत असलेल्या गावठी कट्ट्या बाबत विचारपुस केली असता, त्याने पोलीसांना सहकार्य न करता उडवा उडवीची उत्तरे दिली. यावरून त्याचेवर अधिक संशय बळावल्याने त्याला विश्वासात घेऊन कसोशिने विचारपुस करताच त्यांने त्याच्या हॉटेल जंगदवाच्या पत्र्याचे शेडच्या पाठीमागे जमिनीत खड्डा करून त्यात पुरुण लपवुन ठेवलेला गावढी कट्टा व एक कोयता हा पोलीसांना काढुन दिला आहे. हॉटेल चालक आरोपीला अटक... अवैधरित्या विनापरवाना स्वतः जवळ बाळगत असलेला गावठी कट्टा व कोयता हा पोलीसांनी जप्त करून आरोपी नामे सुनिल वैजिनाथ चंदने याच्याविरूध्द पोलीस ठाणे चिकलठाणा येथे गुन्हा दाखल केला आहे. भारतीय हत्यार कायद्यान्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच चंदनेला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक रविंद्र खांडेकर, पोलीस अंमलदार संजय शिंदे, रवि साळवे, दिपक देशमुख, अजित शेकडे, सतिष देतकर, भारती राठोड, गणेश कोरडे यांनी केली आहे.

## ऑनलाईन सर्च करताना सावधान!

आढळून आले आहे की, आरोपी एक टोळी चालवत होता, जो इंटरनेटच्या माध्यमातून लोकांची फसवणूक करायचा. सामान्य लोकांना कसे फसवले जाते स्कॅमर सर्व लोकप्रिय रुग्णालये आणि इतर सेवांसाठी बनावट वेबसाइट तयार करतात. केवळ हॉस्पिटलसाठीच्याच नाही तर अनेक खोट्या वेबसाईट्स ते तयार करतात. वापरकर्त्या ने या सेवा किंवा कीवर्डशी संबंधित शोध घेताच, त्यांना सर्चमध्ये या बनावट वेबसाइट्स देखील दिसतात. यानंतर यूजर्स दिलेल्या नंबरवर का ॅल करतात आणि इथूनच खऱ्या गेमला सुरूवात होते. स्कॅमर लोक विविध पद्धतीने लोकांच्या खात्यां मध्ये वेगवेगळ्या प्रकारे माहिती काढण्याचा प्रयत्न करतात. वकिलाच्या प्रकरणात घोटाळेबाजांनी रिमोट ॲक्ससे ॲप्लिकेशन डाऊनलोड केले होते. या प्रकारच्या ॲप्लिकेशनचा वापर करून त्यांना तुमच्या फोनमधील एक ना एक डिटेल्स मिळतात. मिळालेल्या डिटेल्सचा वापर करून ते तुमच्या खात्यातील पैसे काढतात. स्कॅमपासून स्वत:ला कसे वाचवावे?

- तुम्ही जेवढे सतर्क राहाल तेवढे सुरक्षित राहाल. - शक्यतो अधिकृत साईटवरूनच तुम्हाला हवे असणारे नंबर मिळवण्याचा प्रयत्न करा. - तुमची वैयक्तिक माहिती कोणाला देऊ नका. - कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका. - कोणाच्या सांगण्यावरून अनोळखी ॲप्स डाउनलोड करू नका. - आवश्यक असल्यास प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोअरवरून कोणत्याही सेवेसाठी ॲप डाउनलोड करा. - घोटाळेबाजांनी पाठवलेल्या लिंकवर क्लिक करून ॲप डाउनलोड करू नका. - तुमचा OTP कधीही अज्ञात व्यक्तीसोबत शेअर करू नका.

## मुलाच्या सहाय्याने पतीचा खून; संशयित ताब्यात

(२०) यांनी सोमवारी पहाटे पाचच्या सुमारास गाढ झोपेत असलेले दादाजी यांच्या डोक्यात मुसळीने जोरदार प्रहार करुन त्यांचा खून केला. याची माहिती मिळताच पोलीस उपयुक्त चंद्रकांत खांडवी, सहायक आयुक्त अंबादास भुसारे, इंदिरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन पगारे, उपनिरीक्षक मनीषा शिंदे यांच्यासह गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व कर्म चारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले आहे मयत दादाजी हे अंबड औद्योगिक वसाहतीत एका खासगी कंपनीत कामाला होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे. याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संपादकीय...



# साधन की अडथळा?

'ते' कोणी तरी आपल्यापेक्षा कमी आहेत या भेदभावकारक भावनेचे मूळच जिज्ञासा नाकारण्यात आणि जी काही आहे ती घडी सांभाळण्यात असते..

आठवडाभर एखाद्याच बातमीची चर्चा प्रसारमाध्यमांतून अधिक चालते, तेव्हा ती बातमी धक्कादायक वगैरे असतेच पण तिचे परिणामही दूरगामी असतात. हेच अमेरिकेत घडले. आपल्या 'आरक्षण धोरणा'शी थोडेफार साम्य असलेले आणि अमेरिकी कृष्णवर्णीयांना विद्यापीठांत प्रवेश अथवा सरकारी सेवांमध्ये प्राधान्य देणारे 'अफर्मेटिव्ह अॅक्शन' अर्थात सकारात्मक कृतीचे धोरण 'राज्यघटनेशी विसंगत, म्हणून अवैध' असल्याचा निकाल २९ जून रोजी अमेरिकी सुप्रीम कोर्टाने दिला. म्हणजे थोडक्यात, आरक्षण सरसकट रद्दच. अर्धशतकाहून अधिक काळ अमलात असणारे धोरण पालटून टाकणाऱ्या निर्णयावर जितकी उलटसुलट चर्चा कोणत्याही देशात घडेल, तितकी ती अमेरिकेतही घडते आहे. अर्थातच, हे धोरण असावे की नसावे हा त्या देशाचा अंतर्गत प्रश्न आहे. पण समतावादी समाजनिर्मितीसाठी सामाजिक उन्नतीचे ध्येय वैश्विक आहे आणि त्याला देशकालाची बंधने नसतात. जिथला समाज समतावादी नसतो तिथे लोकशाहीदेखील हरते, हेही त्रिकालाबाधित सत्य. त्यामुळे अमेरिकेत कोणत्या प्रकारे आणि कोणत्या आधारावर या धोरणाला अवैध ठरवले जाते आहे, हे पडताळून पाहणे सर्वदूरच्या लोकशाहीवाद्यांचे कर्तव्य ठरते.

हे कर्तव्य बजावण्यासाठी अमेरिकेकडे पाहण्यापूर्वी आधी आपल्याकडल्या ताज्या बातमीकडे लक्ष दिले, तर आपल्यात आणि अमेरिकेत काय फरक आहे हेही कळेल. अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतानाही जो जातिमूलक भेदभाव सोसावा लागतो त्याला आळा घालण्यासाठी तुम्ही काय करणार, अशी विचारणा भारताच्या सरन्यायाधीशांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला केली आहे. या संदर्भात पायल तडवी, रोहित वेमुला यांच्या आत्महत्यांचा उल्लेख भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अधिकृतपणे केलेला आहे. त्या उल्लेखामुळे 'रोहित वेमुला दलित नव्हताच' इथपासूनच्या कातडीबचाऊ सत्यापलापांनाही चपराक मिळाली आहे. कातडीबचाऊ युक्तिवाद करण्याची वेळ येते, याचे कारण 'भेदभाव कशाला कोण करेल..', 'आम्ही जातपात मानत नाही..' अशा फसव्या विधानांमध्ये दडलेले असते. ही अशी विधाने स्वतःला, स्वतःपुरती कितीही खरी वाटत असली, तरीदेखील सभोवतालच्या सामाजिक वास्तवामुळे ती फसवीच असल्याचे वारंवार उघड होत असते. त्या वास्तवाकडे डोळेझाक करणे, हा वैचारिक कोडगेपणा ठरतो.

असाच वैचारिक कोडगेपणा अमेरिकी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयातून दिसतो, हे सांगायला कुणा टीकाकारांचे हवाले देण्याचीही गरज नाही. 'वांशिक (काळे आणि गोरे हा) भेद नाहीसा करायचा असेल तर तो सर्वत्र सरसकट नाहीसाच व्हायला हवा' असे वरवर पाहाता अगदी आदर्शवादी वाटणारे विधान अमेरिकी चीफ जस्टिस जॉन रॉबर्ट यांनी केले. पण अमेरिकी पोलिसांनी निव्वळ संशयावरून कृष्णवर्णीयांच्या केलेल्या हत्या, अनेक अमेरिकी राज्यांत आजही कृष्णवर्णीयांना मिळणारे दुय्यम स्थान आणि काही स्थलांतरित भारतीयदेखील अमेरिकी गोऱ्या वंशभेदवाद्यांनी काळ्यांबद्दल पसरवलेल्या संशयांना थारा देतात ही सामाजिक स्थिती हे वास्तव पाहायचेच नाही, असा दंभ चीफ जस्टिस जॉन रॉबर्ट यांच्या त्या विधानातून दिसतो. त्या दंभाचा निषेध 'सायंटिफिक अमेरिकन' आणि 'नेचर' या बिगरराजकीय विषयांना वाहिलेल्या आणि जागतिक मान्यता मिळवणाऱ्या नियतकालिकांतून झाला, हे उत्तम झाले. अमेरिकी सुप्रीम कोर्टातील १९७६ मधल्या एका खटल्यात 'अफर्मेटिव्ह अॅक्शन'ची गरज नसल्याचे मत व्यक्त झाल्याचा आधार आता अनेक जण घेताहेत; पण 'नेचर'मधल्या लेखाने, २००९ मध्ये अशा धोरणाची गरज आहेच असाही निकाल आला होता याची आठवण दिली आहे.

'सायंटिफिक अमेरिकन'ने तर 'या निर्णयामुळे विज्ञान, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राचे नुकसान होईल' असे संपादकीयच लिहिले आहे. हे नुकसान ज्यांना प्रवेश नाकारला जाईल त्या कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांचेच नव्हे तर अंतिमतः, विज्ञान-संशोधनासारख्या क्षेत्रात वांशिक बहुविधता कमी होण्याने त्या क्षेत्राचेही असेल, असा या संपादकीय टिप्पणीचा अर्थ. तो अनेकांना पटणार नाही. कारण 'ते' आपल्यापेक्षा कमी आहेत या भेदभावकारक भावनेचे मूळच जिज्ञासा नाकारण्यात आणि जी काही आहे ती घडी सांभाळण्यात असते. ही घडी जणू काही आरक्षणामुळे विस्कटली, असे समजले जाते ते यामुळेच. मुळात आरक्षण हे साधन आहे आणि समता हे ध्येय, हेसुद्धा खिजगणतीत नसणाऱ्या मानसिकतेतून हा विरोध होत राहातो. हा समाजवैज्ञानिक प्रयोग आम्हाला उपयोगी पडला असे सांगणारे काही जण पुढे आले तर मात्र आता यापुढे आरक्षण नकोच, असा सोयीस्कर अर्थ लावला जातो. हे सारे अमेरिकेत घडत होतेच. त्यामुळेच तर तेथील सुप्रीम कोर्टाने ज्या चार मुद्द्यांवर 'अफर्मेटिव्ह अॅक्शन' धोरण नापास केले, त्यापैकी तीन मुद्दे हे वरपांगी 'सर्व समान' पद्धतीचा आदर्शवाद, 'आरक्षणाला कालमर्यादा हवी' हा उदात्त विचार तसेच संबंधित विद्यापीठांचा कमी पडलेला युक्तिवाद असे आहेत. चौथा मुद्दा मात्र, जर एखाद्या विद्यार्थ्याने आपल्यावरील अन्याय या विद्यापीठात प्रवेश मिळाल्याने दूर होणार असल्याचे पटवून दिले तर अशा विद्यार्थ्याला प्रवेश द्यावा, या प्रकारचा आहे. म्हणजे एकट्यादुकट्या विद्यार्थ्यांचा विचार करण्यास राजी असलेले अमेरिकी सुप्रीम कोर्ट, वंशभेदाच्या भावनेतून अख्ख्या समाजावर अन्याय होऊ शकतो हे वास्तव अजिबात स्वीकारत नाही.

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज




आज ११ जुलै, आजचा दिवस संपूर्ण जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आलं तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०११ म्हणजे अवघ्या चोविस वर्षात जगातील लोकसंख्या २ अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. आज लोकसंख्येच्या बाबतीत आपण जगात अव्वल स्थानी पोहचलो आहोत याच वर्षी एप्रिल महिन्यात आपण चीनला मागे सारून लोकसंख्येत अव्वल स्थान प्राप्त केले आहे. या वर्षीच्या सुरवातीलाच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आता भारताची लोकसंख्या चिनपेक्षा वीस लाखांनी जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# 'समान नागरी कायद्या'ला विरोधाची खुसपटे..

'जमियत उलेमा ए हिंद' या मुस्लीम धार्मिक संस्थेने 'समान नागरी कायद्या'मुळे देशाच्या एकात्मतेला धोका असल्याचा इशारा दिल्याचे वाचले. मौलाना अर्शद मदनी ('जमियत'चे नेते) यांनी आपले तसे लेखी मत विधी आयोगाकडे कळवले आहे. हे अपेक्षितच होते. राज्यघटनेचे सध्याचे स्वरूप लक्षात घेता, 'समान नागरी कायद्या'च्या घटनात्मक वैधतेला न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. तसे झाल्यास प्रस्तावित समान नागरी कायदा समजा सर्वोच्च न्यायालयाकडून घटनात्मकरित्या अवैध ठरवला गेला, तर ते देशहिताच्या दृष्टीने फार घातक ठरेल. असे होऊ नये, यादृष्टीने आधीपासूनच काळजी घ्यावी लागेल. यामध्ये अनुच्छेद २६ व २९ हे महत्त्वाचे आहेत.

अनुच्छेद २६ पुढीलप्रमाणे आहे :"धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य : सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता, व आरोग्य यांच्या अधीनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास (ख) धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा हक्क असेल."

अनुच्छेद २९ पुढीलप्रमाणे आहे :"अल्पसंख्याक वर्गांच्या हितसंबंधांचे संरक्षण (१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची वेगळी भाषा, लिपी, वा संस्कृती असेल, त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल."

सध्या मुस्लिमांना ब्रिटिशांनी १९३७ साली लागू केलेला 'शरियत' आधारित मुस्लीम व्यक्तिगत कायदाच लागू आहे. नागरी कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या विवाह, घटस्फोट, पोटगी, वारसाहक्क, दत्तक, इत्यादी बऱ्याच बाबी या आमच्या 'धर्मविषयक बाबी' असल्याचा दावा ते करू शकतात. आणि गेली इतकी वर्षे या बाबी त्यांच्या बाबतीत 'शरियत' या धार्मिक कायद्यानुसारच नियंत्रित होत असल्याने, तो दावा नाकारता येणे कठीण आहे. तसेच अनुच्छेद २९ मध्ये जो 'संस्कृती जतना'चा हक्क दिला गेला आहे, त्याचाही आधार – उर्दू भाषा, लिपी व इस्लामी संस्कृती या आधारे ते घेऊ शकतात. व्यक्तिगत नागरी कायद्याच्या कक्षेत येणारे बहुतेक सर्व विषय, हे 'आमच्या वेगळ्या संस्कृती'चा भाग असल्याचा दावा ते करू शकतात. त्यामुळे, या दोन अनुच्छेदांच्या आधारे 'समान नागरी कायद्या'ची घटनात्मक वैधता संशयास्पद ठरू शकते. यासाठी, प्रस्तावित समान नागरी कायदा आणतानाच, (त्याच वेळी) या दोन्ही अनुच्छेदांत दुरुस्ती अत्यंत आवश्यक आहे.




या दोन्ही अनुच्छेदांत, दुरुस्तीद्वारे, शेवटी एक उपखंड जोडावा लागेल, जो असा असेल – "या अनुच्छेदातील कोणतीही तरतूद, ही अनुच्छेद ४४ नुसार आणल्या जाणाऱ्या नवीन 'समान नागरी संहिते'च्या तरतुदींच्या अधीन राहील." (अर्थात यातील कोणत्याही तरतुदीमुळे समान नागरी कायद्यातील कोणत्याही तरतुदीला बाधा येणार नाही.) ही घटनादुरुस्ती केली गेल्यास, या अनुच्छेदांच्या आधारे समान नागरी कायद्याला आव्हान देणे कठीण होईल. सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा आणण्याबाबत सरकार खरेच गंभीर असेल, तर अशी घटनादुरुस्ती करणे आवश्यक आहे. अरविंद नेताम यांनी असे विधान केले आहे की, "राज्यघटनेच्या अनुच्छेद १३ (३)(अ) नुसार आदिवासींच्या परंपरागत चालीरीतींना कायद्यासारखा दर्जा दिलेला आहे." वास्तविक त्यांचे हे विधान ते पूर्णसत्य नसून अर्धसत्य आणि बुद्धीभेद करणारे आहे. कारण, राज्यघटनेतील अनुच्छेद १३(१) पुढीलप्रमाणे आहे : या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील, तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्ती पुरते शून्यवत असतील. इथे जे 'कायदे' म्हटले आहे, त्यात नेताम उल्लेख करीत असलेल्या स्थानिक आदिवासी प्रथा, परंपरा यांचा समावेश होतो. याचा अर्थ, मुळात आदिवासींच्या ज्या चालीरीती संविधानाच्या भाग ३, 'मुलभूत हक्क' – यातील तरतुदींशी विसंगत असतील, त्या संविधान अंगीकृत केले गेल्यावरच (२६ नोव्हेंबर १९४९ पासूनच) 'शून्यवत' आहेत! प्रश्न फक्त इतकाच आहे, की गेली सुमारे ७४ वर्षे याकडे कोणी म्हणावे तसे लक्ष दिलेले नाही. आणि आज इतक्या वर्षांनी जेव्हा त्या दिशेने काही हालचाल होत आहे, तेव्हा मात्र "अजूनही ती वेळ आलेली नाही, समाज प्रबोधन, सर्वांना विश्वासात घ्यावे लागेल, सर्वांशी चर्चा करावी लागेल..." वगैरे नेहमीचेच मुद्दे काढले जात आहेत. आदिवासी महिलेला वडिलोपार्जित जमिनीवर अधिकार सांगता येत नसेल, तर ते घटनेच्या अनुच्छेद १४ व १५ नुसार दिल्या गेलेल्या 'समानते'च्या अधिकारा विरुद्ध, त्याच्याशी विसंगत असल्याने ती प्रथा अनुच्छेद १३(१) नुसार शून्यवत (प्रभावहीन) आहे. कितीही जुनी असली, तरी अन्याय प्रथा, रुढी चालू ठेवणे समर्थनीय नाही. शिवाय, राज्यघटनेच्या भाग ४ 'मुलभूत कर्तव्ये'मधील अनुच्छेद ५१(क) (इ) नुसार "स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे" हे आपणा सर्वांचे मुलभूत कर्तव्य आहे.

थोडक्यात राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये दिलेले आश्वासन पूर्ण करण्यास आधीच सुमारे ७४ वर्षे उशीर झालेला आहे. तेव्हा आता त्यामध्ये आणखी काहीही अडथळे न आणता, तथाकथित तात्त्विक मुद्दे उपस्थित न करता, त्याची अंमलबजावणी तातडीने सुनिश्चित करावी लागेल. तेच देशहिताचे आहे.

# अमली पदार्थ विभागाचे पोलीस असल्याचं भासवून तरुणाकडून उकळले साडेपाच लाख; मुंबईतील धक्कादायक प्रकार

मुंबईतील वर्सोवा (Versova) भागात बनावट पोलिसांनी (Fake Police Officers) एका तरुणाकडून पैसे उकळले आहेत. अमली पदार्थ विभागाचे पोलीस अधिकारी (Narcotics Department Police Officer) असल्याचं भासवून 6 जणांनी 26 वर्षीय यश चावला नावाच्या तरुणाची फसवणूक केली आहे. ढोंगी पोलिसांनी तरुणाकडून 5 लाख 30 हजार रुपये उकळले आहेत. फिर्या दीला तुझ्यावर ड्रग्ज घेतल्याची केस दाखल करू, असं धमकावत त्याला रात्रभर रिक्षामध्ये फिरवून 50 लाखांच्या खंडणीची मागणी केली होती. या प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने एका मुख्य आरोपीला अटक केली असून इतर पाच जणांचा शोध पोलीस घेत आहेत.



पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्या दीयश चावला याचं स्टेशनरी शॉप आहे. यश याने पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, सदर प्रकार हा 30 जून रोजी घडला होता. त्यावेळी आरोपी असलेले बनावट पोलीस वर्सोवा येथील रेस्टॉरंट अँड बारमध्ये गेले आणि 4 जण पोलीस असल्याचं सांगून यश जवळ बसले. मग फिर्या दीतरुणाला धमकावून दोघे एका रिक्षात आणि इतर चार जण दुसऱ्या रिक्षात बसले. या सहा जणांनी अंमली पदार्थ विभागाचे पोलीस असल्याचं भासवून तरुणाला मुंबईभर फिरवलं. सहा बनावट पोलिसांनी गूगल पे (Google Pay) आणि, NEFT द्वारे 5.30 लाख घेतले आणि सात लाखांचा चेक (Check) सुद्धा घेतला, जो नंतर बाऊन्स झाला.

आरोपींनी मास्क लावून ही सर्व फसवणूक केली, यात रिक्षावाल्याचा देखील समावेश आहे. सहा आरोपींपैकी एक मुख्य आरोपी दीपक विलास जाधव (वय 36) याला अटक केली असून, तो स्वतः इंजिनिअर (Engineer) असल्याचा दावा करत आहे.

# रिक्षाचे हुबेहूब बनावट मीटर बनवायचा, पण डीलरला संशय झाला अन् गेम झाला

नामांकित सुपर मीटर मॅनेफॅक्चरींग कंपनीचे बनावट मीटर बनविणाऱ्याला औरंगाबाद (Aurangabad) शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईत आरोपींकडून 208 मीटरसह इतर साहित्य असा सुमारे 5 लाख 50 हजार 400 रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. मोहम्मद आजम अब्दुल रहेमान (वय 43, रा. मकबुल पार्क, नारेगाव मूळ रा. गल्ली नं. 7, भगतवाडी, जुनाशहर जि. अकोला) असे आरोपीचे नाव आहे. दरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असलेल्या मोहम्मद आजम अब्दुल रहेमान याला 13 जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. पी. बेदरकर यांनी दिले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुपर मिटर मॅनेफॅक्चरिंग कंपनीत भागीदार असलेले राजेश राजपिंताबर चिंता (वय 51, रा. मगरपट्टा सिटी, हडपसर पुणे) यांची कंपनी रिक्षा आणि टॅक्सीच्या मिटरचे उत्पादन करते. त्यांचे कंपनीचे मिटर महाराष्ट्र प्रादेशिक परिवहन विभागाने अधिकृत केलेले असून महाराष्ट्रासह, गुजरात, तेलंगणा, तामीळनाडू, केरळ, दिल्ली आणि इतर ठीकाणी कंपनीचे डिलर व सबडिलर्स आहेत. या कंपनीचे औरंगाबादच्या भोईवाडा पसिरात इम्रान खान नसीरखान हे डीलर असून त्यांचे बाय. एफ. खान मिटर सर्व्हिस नावाने, मिटर विक्री व दुरुस्तीचे अधिकृत दुकान आहे. इम्रान खान यांनी कंपनीला माहिती दिली की, आझम नावाचा व्यक्ती कंपनीच्या मिटरची हुबेहुबे कॉपी करुन ते बनावट मिटर कमी दरात विक्री करित आहे. दरम्यान या माहितीच्या आधारे कंपीनीने गुन्हे शाखेला तक्रार अर्ज दिला.

## रशियातील कंपनीशी ४०० 'वंदे भारत' ट्रेनच्या बांधणीसाठी करार

**मुंबई :** लातूर येथील रेल्वेच्या कारखान्यात ४०० वंदे भारत ट्रेनच्या बांधणीसाठी रेल्वेने एका रशियन कंपनीसोबत करार केला आहे', अशी माहिती रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी शनिवारी सीएसएमटीच्या कार्यक्रमात दिली. नेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा विकास विमानतळाच्या धर्तीवर करण्यात येणार असून येथे प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्याचे प्रत्यक्ष काम जानेवारी महिन्यात सुरू करण्यात येणार आहे, असे दानवे यांनी सांगितले. सीएसएमटी येथील फलाट क्रमांक सहा आणि सातच्या ठिकाणी 'तर्पण : संवेदना फाऊंडेशन'च्या वतीने मुंबई रेल्वे स्थानकातील बूट पॉलिश कामगारांना बूट पॉलिश किटचे वितरण करण्यात आले.

## पुण्यात १६५ गुन्हेगार अटकेत
### कारवाईत पोलीस आयुक्त सहभागी

शहरात वाहन तोडफोडी, हाणामारीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी आठवड्यात दुसऱ्यांदा गुन्हेगारांची झाडाझडती घेतली. शहराच्या वेगवेगळ्या भागात पोलिसांनी विशेष मोहीम (कोम्बिंग ऑपरेशन) राबविली. पोलीस आयुक्त रितेश कु मार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक मध्यरात्री शहराच्या वेगवेगळ्या भागास भेट देऊन नाकाबंदी, प्रतिबंधात्मक कारवाईचा आढावा घे तला. पोलीस आयुक्तांनी शहरातील वेगवेगळ्या भागातील चौक्यांना भे ट दे ऊन पाहणी के ली. पोलिसांनी मध्यरात्री शहरातील १६५ गुन्हेगारांना अटक के ली. शहरातील बस स्थानके, रे ल्वे स्थानक, हॉटेल, लॉजची तपासणी करण्यात आली. मध्यरात्री संशयित व्यक्तींची तपासणी करण्यात आली. गु न्हे शाखा, तसे च शहरातील विविध पोलीस ठाण्यातील पथके नाकाबंदी मोहिमेत सहभागी झाले होते. वाहतूक शाखेने १८२२ वाहनचालकांची तपासणी केली.

## शिवसेनेच्या ४०, तर उबाठा गटाच्या १४ आमदारांना विधानसभा अध्यक्षांकडून नोटीस

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्दे शानुसार विधानसभा अध्यक्ष राहु ल नार्वे कर यांनी शनिवारी शिवसेनेच्या ४० आमदारांना नोटीस बजावली आहे. त्यासोबतच अपात्रतेच्या मुद्यावर म्हणणे मांडण्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी ठाकरे गटाच्या १४ आमदारांनाही नोटीस जारी केली आहे. या नोटिशीवर उत्तर देण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या गटातील १६ आमदारांना अपात्र ठरविण्यासाठी शिवसेनेने दाखल के लेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घेण्याचे अधिकार विधानसभा अध्यक्ष राहु ल नार्वेकर यांना दिले होते. त्यासाठी विधानसभा अध्यक्षांना विशिष्ट कालमर्यादा घालून दिलेली आहे. त्यानुसार विधानसभा अध्यक्षांनी आपली कार्यवाही सु रु के ली अस ून शिंदे गटाच्या ४० आमदारांना तर ठाकरे गटाच्या १४ आमदारांना नोटीस बजावली आहे. एकनाथ शिंदे गटाने भरत गोगावले यांची प्रतोद म्हणून केलेली नियुक्ती बेकायदेशीर असल्याचे मत सर्वोच्च

### उत्तर देण्यासाठी दिली ७ दिवसांची मुदत

न्यायालयाने व्यक्त केले होते. त्यामुळे शिवसेनेच्या आमदारांना ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांचा व्हीप लागू होणार आहे. मात्र, पक्षाची घटना, विधिमंडळाचे नियम आणि इतर कायदेशीर बाबी तपासून विधानसभा अध्यक्षांना अपात्रतेच्या मुद्यावर निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यासाठीच दोन्ही गटांच्या आमदारांना नोटीस बजावण्यात आली आहे. अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी शिंदे गटातील १६ आमदारांना विधानसभा अध्यक्षांकडे आपली बाजू मांडताना सर्व पु रावे सादर करावे लागणार आहेत. निवडणूक आयोगाकडून विधिमंडळाला शिवसेनेच्या घटनेची प्रत प्राप्त झाली आहे. पक्ष घटनेचा अभ्यास करून १६ आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्यावर विधानसभा अध्यक्ष राहु ल नार्वे कर यांच्याकडून लवकरच निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी बजावलेल्या नोटिशीला आम्ही कायदेशीरपणे उत्तर दे णार असू न आमची बाजू सत्याची असल्याने विजय आमचाच होईल, असा विश्वास शिं दे गटाचे नेते शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला. विधानसभा अध्यक्षांच्या नोटिशीवर आम्ही ७ दिवसांच्या मुदतीत न्याय्य बाजू मांडणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने निर्दे श देऊनही शिं दे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरविण्याच्या मुद्यावर निर्णय घेण्याला विधानसभा अध्यक्षांनी दोन महिने उशीर लावला असल्याची प्रतिक्रिया विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

## 'वंदे भारत'सह सर्व गाड्यांचे भाडे होणार कमी ; रेल्वे तिकिटात २५ टक्क्यांपर्यंत होईल कपात
# करोडो रेल्वे प्रवाशांसाठी खूशखबर...

रेल्वे मंत्रालयाने आपल्या प्रवाशांना एक खूशखबर दिली आहे. 'वंदे भारत'सह सर्व गाड्यांचे एसी चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह क्लास आणि विस्टाडोम कोचचे भाडे २५ टक्क्यांपर्यंत कमी केले जाणार आहे, अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली आहे.

ट्रेनमध्ये जास्तीत जास्त जागांचे आरक्षण व्हावे, यासाठी भाड्यात कपात केली जाणार असल्याचे रेल्वेने सांगितले. रेल्वेचे भाडे आता स्पर्धात्मक पद्धतीने ठरवण्यात येणार आहे. रेल्वेमधील आरामदायी सुविधांचा वापर प्रवाशांना करता यावा, या दृष्टीने रेल्वे मंत्रालयाने हा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. एसी प्रवास सुविधा असलेल्या गाड्यांमध्ये सवलतीच्या दराची योजना लागू करण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे.



**बऱ्याच दिवसांपासूनची मागणी...**

वंदे भारतसह इतर सुपरफास्ट एक्स्प्रेसचं तिकीट हे फार जास्त होतं, त्यामुळे तिकिटांचे दर कमी करण्याची मागणी बऱ्याच दिवसांपासून होत होती. त्यासाठीच भारतीय रेल्वे तिकिटांच्या किमती कमी करण्यासाठी आणि प्रवाशांसाठी अधिक व्यवहार्य प्रवास बनवण्यासाठी रेल्वेने तिकीट भाड्याच्या कपातीचा निर्णय घेतला आहे.

### कोणत्या रेल्वे गाड्यांना लागू होणार योजना?

ही योजना एसी चेअरकार आणि एक्झिक्युटिव्ह क्लास असणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना लागू होणार आहे. यामध्ये अनुभूती आणि व्हिस्टाडोम कोच असणाऱ्या रेल्वेंसह वंदे भारत एक्स्प्रेसचाही समावेश आहे. या डब्यांमधील प्रवाशांची संख्या वाढवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. रेल्वे मंत्रालयाने सांगितल्याप्रमाणे, मूळ भाड्यावर २५ टक्क्यांपर्यंत सूट लागू केली जाणार आहे. आरक्षण शुल्क, सुपर फास्ट अधिभार, जीएसटी सारखे इतर शुल्क स्वतंत्रपणे आकारले जातील.

### नेमका आदेश काय?

- गेल्या ३० दिवसांत ज्या गाड्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी जागा आरक्षित आहे, अशा गाड्यांमध्ये सवलत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. ही सवलत त्वरित प्रभावाने लागू केली जाईल.
- रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, ही सवलत तत्काळ प्रभावीपणे लागू होणार आहे. अर्थात, ज्यांनी आधीच तिकीट बुक केलं आहे अशा प्रवाशांना भाड्याचा परतावा दिला जाणार नाही.

## पुण्यात पाच तास बत्ती गुल... नागरिकांचे हाल

**पुणे (प्रतिनिधी) :** पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या ४०० केव्ही शिक्रापूर ते तळेगाव अतिउच्चदाबाची एक वीजवाहिनी तुटल्याने शनिवारी सकाळी ९ च्या सुमारास पिंपरी-चिंचवड परिसर, शिक्रापूर, उर्से, थेऊर, पेरणे आदी परिसरातील ग्राहकांचा वीजपुरवठा बंद पडला होता. मात्र, पावसामुळे विजेची मागणी कमी झाल्यामुळे तुटलेल्या अतिउच्चदाब वीजवाहिनीचा भार इतर वीजवाहिन्यांवर देण्यात आला आणि भार व्यवस्थापनाद्वारे या सर्वच भागात दुपारी १२. ४५ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरू करण्यात आला.

## परशुराम घाटात कोसळली दरड

मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात दरड कोसळण्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. आठवड्यातच तिसऱ्यांदा दरड कोसळण्याची घटना घडल्याने वाहनचालक वप्रवासी तसेच पेढे-परशुरामवासीयांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सुदैवाने घाट बाजूकडील एकेरी मार्गावर दरड कोसळल्याने अपघाताची कोणतीही घटना घडलेली नाही.

मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटातील चौपदरीकरणाचे काम पावसाळ्यापूर्वी बऱ्यापैकी पूर्ण झाले आहे. मात्र, पावसाळ्यात कोणतीही दुर्घटना घडू नये. यासाठी प्रशासनाने घाट बाजू कडील एकेरी मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे. तर पे ढे बाजू कडील एकेरी मार्गावरून वाहतूक सुरू आहे; परंतु आठवड्याभरातच तीन वे ळा घाट



बाजूकडील एकेरी मार्गावर दरड कोसळण्याची घटना घडली. यामध्ये शुक्रवारी रात्री तिसऱ्यांदा दरड कोसळण्याची घटना घडली. यामध्ये संरक्षक भिंतीला देखील दणका बसला आहे. परशुराम घाटात अर्धवट स्थितीत डोंगरकटाई केल्यामुळे दरड कोसळण्याची घटना घडत आहे. शुक्रवारी रात्री दरड कोसळल्याची घटना घडल्यानंतर ठे केदार कं पनीने शनिवारी दरड बाजू ला करण्यास सुरुवात के ली. मात्र पेढे बाजूकडील एकेरी मार्गावरून वाहतूक सु रळीत राहिल्याने वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नाही.

# उत्तर भारतात मान्सूनच्या हाहाकार
## आठ राज्यांमध्ये महापुराचे संकट; पावसाचे ११ बळी



मंडी : मुसळधार पावसामुळे बियास नदी धोक्याची पातळी ओलांडून दुथडी भरून वाहत असून काठावरची मंदिरे पाण्याखाली गेली आहेत.

बिपरजॉय चक्रीवादळामुळे देशात मान्सूनला उशीर झाला तरीही जुलै महिन्यात मात्र पावसाने थैमान घातल्याचे चित्र सध्या आहे. देशातील हरियाणा, पंजाब, चंढीगड, हिमाचल प्रदेश,दिल्ली, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या आठ राज्यांमध्ये पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. हवामान खात्याकडूनही अनेक राज्यांना सतर्कतेचा इशारादेखील दिला आहे. माहितीनुसार, हवामान खात्याने आठ राज्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत देशात २४३.२ मिलीमीटर पाऊस पडला आहे. शनिवारपासून उत्तर भारतातील अनेक राज्यात पावसाने थैमान घातले आहे. मुसळधार पावसाने अनेक नवीन रेकॉर्डदेखील बनवले आहेत. दिल्लीमध्ये गेल्या चोवीस तासांमध्ये १५३ मिमी पाऊस झाला आहे.

**हरियाणा, पंजाब, चंढीगडला पावसाने झोडपून काढले**

हरियाणा, पंजाब आणि चंढीगडमध्ये पावसाचा कहर पाहायला मिळाला आहे. चंढीगडमधील मोहाली जिल्ह्यात पावसाने जराही उसंत घेतली नाही तर पंजाब आणि हरियाणा राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. तसेच पुढील चोवीस तास पावसाचा जोर असाच कायम राहणार असल्याचे हवमान विभागाकडून सांगण्यात आले आहे.

**उत्तराखंडात पावसाचे थैमान**

उत्तराखंडमधील अनेक जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच भूस्खलन होण्याची शक्यता असल्याने योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी प्रशासनाला सतर्कतेचा इशारादेखील दिला आहे. मुसळधार पावसामुळे उत्तराखंडातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

**काश्मीरमध्ये परिस्थिती बिकट**

जम्मू आणि काश्मीरमध्ये सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. तसचे जम्मू आणि काश्मीरमधील अनेकजिल्ह्यांना रेड अलर्टदेखील देण्यात आला आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये अनेक ठिकाणी रस्ते खचल्याच्या दुर्घटना घडल्याचे चित्रदेखील पाहायला मिळत आहे.

**हिमाचलात पावसाचा कहर**

हिमाचल प्रदेशात गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या पावसाने कहर केला आहे. राज्याच्या विविध भागात भूस्खलनामुळे मोठे नुकसान झाले आहे. शिमला जिल्ह्यातील कुमारसैन भागात ढिगाऱ्याखाली दबल्याने एक जोडप्याचा आणि एका मुलाचा मृत्यू झाला तर अन्य दोघे जखमी झाले.

### पावसाने घेतले ११ जणांचा बळी

गेल्या काही दिवसांपासून उत्तर भारतात पावसाचा कहर सुरू आहे. रविवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे उत्तर भारतातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसामुळे घडलेल्या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे.

उत्तर भारतातील हिमाचल प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, उत्तरप्रदेश, राजस्थान या राज्यांना मुसळधार पावसाने झोडपले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे या राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील नद्या धोक्याच्या पातळीवरुन वाहत आहेत. यामुळे हिमाचल प्रदेश आणि हरियाणामध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. काही भागात भूस्खलनदेखील होत आहे.

हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस सुरू असल्याने मंडीमध्ये बियास नदी दुथडी भरून वाहत आहे. कुल्लू येथे बियास नदीच्या प्रवाहात राष्ट्रीय महामार्ग तीनचा काही भागही वाहून गेला आहे.

### दिल्लीत पावसाने तोडला ४१ वर्षांचा विक्रम



दिल्लीत पावसाने आपला चार दशकांचा विक्रम मोडला आहे. शनिवारचा पूर्ण दिवस ते रविवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत राजधानीत १५३ मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद झाली होती. रविवारी दिवसभरदेखील दिल्लीत पावसाचे धूमशान होते.

एका दिवसात जास्त पाऊस पडल्याच्या वर्षांचा विचार केला तर २०१३ रोजी १२३.४ मिलीमीटर व २०२२ साली ११७ मिलीमीटर इतका पाऊस पडला होता. तर २००३ साली एका दिवसात १३३.४४ मिलिमीटर इतका पाऊस पडला होता. १९८२ साली १७० मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद झाली होती. सर्वात जास्त पाऊस पडल्याची नोंद २१ जुलै १९५८ रोजी झाली होती. त्यादिवशी तब्बल २६६.२ मिलीमीटर इतका पाऊस पडला होता. सातत्यपूर्ण पावसामुळे दिल्लीतील जनजीवन अस्तव्यस्त झाले आहे. सखल भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे तर ठिकठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. पावसामुळे वाहतुकीचादेखील बोजवारा उडाला आहे.

# १६ आमदारांचा वाद पुन्हा न्यायालयात
### ठाकरेंच्या याचिकेवर १४ जुलैला सुनावणी

शिवसेना शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत ठाकरे गटाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात १४ जुलैला सुनावणी होणार असल्याची माहिती आहे. या आमदारांच्या अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी तातडीने निर्णय घेण्यासाठी ठाकरे गटाच्या वतीने गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. दोन महिने झाले तरी अध्यक्षांकडून निर्णयाबाबत हालचाल होत नसल्याचा दावा करत ठाकरे गटाच्या सुनील प्रभू यांनी ही याचिका दाखल केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने ११ मे रोजीच्या निकालात विधानसभा अध्यक्षांना १६ आमदारांच्या बाबतीत मुदतीत निर्णय घेण्याचे निर्देश दिले असतानाही राहुल नार्वेकर हे जाणूनबुजून सुनावणीला उशीर करत असल्याचा दावा या याचिकेतून करण्यात आला आहे. त्यावर आता १४ जुलै रोजी सुनावणीची शक्यता आहे.

दरम्यान, विधीमंडळाने दोन दिवसांपूर्वी शिवसेनेच्या ४० आणि ठाकरे गटाच्या १४ आमदारांना नोटीस जाहीर केली आहे. त्यांना अपात्र प्रकरणात सात दिवसांत लेखी उत्तर देण्यास सांगितले आहे.

या आमदारांकडून सात दिवसांत लेखी उत्तर आले नाही तर विधीमंडळ थेट कोणतीही कारवाई करणार नाही, कारवाई करण्याआधी विधानसभा अध्यक्ष



आमदारांना प्रत्यक्ष सुनावणीसाठी बोलावतील. त्यावेळी प्रत्येक आमदारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाणार.

अपात्रतेविरोधातील कारवाई टाळण्यासाठी आमदारांना सर्व पुरावे सादर करावे लागणार आहेत. निवडणूक आयोगाकडून विधीमंडळाला शिवसेनेच्या घटनेची प्रत प्राप्त झाली आहे. शिवसेनेच्या घटनेचा अभ्यास करून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर लवकरच निर्णय घेण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना अपात्र ठरवण्यात यावे, यासाठीची ठाकरे गटाची याचिका विधानसभा अध्यक्षांकडे दाखल आहे. त्यासाठी ठाकरे गटाकडून अनेकदा स्मरणपत्रही देण्यात आलेले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत. यामुळे आता नोटीस देऊन अध्यक्ष नार्वेकर हे एकनाथ शिंदेंसह इतर आमदारांबाबत कार्यवाहीची सुरुवात करणार आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898